Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# बीड जिल्हाः लोकसंख्या साक्षरता व लिंग गुणोत्तर

**डॉ. राजपंगे एम.जी.**
आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा
ता. आष्टी, जि. बीड

**शिंदे एस. बी.**
ॲड. एम.एन. देशमुख महाविद्यालय,
राजुर, जि. अहमदनगर

**प्रस्तावनाः**

भारतात जनगणनेनुसार अशा व्यक्तीला साक्षर म्हणून ओळखले जात होते की, ज्याचे वय ६ वर्षापेक्षा जास्त असून त्याला कमीत कमी लिहिता वाचता यावे. मानवाच्या बदलत्या प्रवृत्तीचा परिणाम उत्पादन वाढविण्यासाठी आदानांचा वापर करण्यात होतो. सर्व क्षेत्रातील नविन संशोधन व त्याचा प्रसारामध्ये शिक्षणाची भुमिका महत्वाची असते.

**अभ्यासक्षेत्र :**

बीड जिल्हा मराठवाड्याच्या मध्यस्थानी आहे. बीड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२७' उत्तर ते १९°२७' उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार ७४°४९' पूर्व ते ७६°४४' पूर्व रेखांश असा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना, पूर्वेस परभणी व लातून हे जिल्हे आहेत. दक्षिणेस उस्मानाबाद व अहमदनगर तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६९४ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या एकुण क्षेत्रफळाच्या ३.४७% एवढे आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची एकुण लोकसंख्या २५,८५,०४९ होती. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण २.३०% आहे. जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन महसुली विभाग पाडण्यात आले आहे. एक उपविभाग बीड येथे असून याअंतर्गत बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, शिरुर (कासार) हे तालुके येतात. दुसरा उपविभाग अंबाजोगाई येथे असून त्याखाली अंबाजोगाई, केज, माजलगांव, धारुर, परळी, वडवणी हे तालुके येतात. जनगणना २०११ नुसार जिल्ह्यात एकूण १३६८ गांवे आहेत.

**साक्षरता:**

बीड जिल्ह्यातील साक्षरतेचा तपशील तक्ता क्र. १ मध्ये देण्यात आला आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील लोकसंख्या साक्षरता (सन २०११)**

| अ. क्र. | तालुका | साक्षरता प्रमाण | | | स्त्री-पुरुष प्रमाणातील फरक |
|---|---|---|---|---|---|
| | | एकुण | पुरुष | स्त्री | |
| १ | आष्टी | ७५.७५ | ८४.७ | ६६.२२ | १८.४८ |
| २ | पाटोदा | ७३.९२ | ८४.२३ | ६२.६६ | २१.५७ |
| ३ | शिरुर (का) | ७३.१२ | ८३.२५ | ६२.१३ | २१.१२ |
| ४ | गेवराई | ७३.८५ | ८३.३ | ६३.८४ | १९.४६ |
| ५ | माजलगाव | ७५.०६ | ८३.८ | ६५.७८ | १८.०२ |
| ६ | वडवणी | ७२.६९ | ८२.७२ | ६१.९७ | २०.७५ |
| ७ | बीड | ८०.६६ | ८८.२५ | ७२.५२ | १५.७३ |
| ८ | केज | ७७.१८ | ८५.९ | ६७.७१ | १८.१९ |
| ९ | धारुर | ७३.७३ | ८२.९७ | ६३.७६ | १९.२१ |
| १० | परळी | ७८.५९ | ८६.४६ | ७०.२१ | १६.२५ |
| ११ | अंबाजोगाई | ८१.४७ | ८८.४७ | ७४.०५ | १४.४२ |
| | बीड जिल्हा | ७६.९९ | ८५.५५ | ६७.८२ | १७.७३ |

स्त्रोत: बीड जिल्हा जनगणना, २०११

तक्ता क्र. १ वरुन असे लक्षात येते की, जिल्ह्याची एकुण साक्षरता प्रमाण ७६.९९% इतके आहे. यापैकी पुरुष साक्षरता प्रमाण हे ८५.५५% इतके तर स्त्री साक्षरता प्रमाण हे ६७.८२% इतके आहे. जिल्ह्याच्या एकुण साक्षरतेपैकी ८०% पेक्षा जास्त साक्षरता ही बीड व अंबाजोगाई येथे दिसून येते. कारण ही दोन्हीही तालुके बीड व अंबाजोगाई ही मोठी शहरे असलेली व धार्मिक पर्यटन क्षेत्र असल्याने नागरी लोकसंख्या जास्त असलेली आहेत. त्यामुळे येथे लोकसंख्येची साक्षरता ही जास्त दिसून येते. ७५% ते

८०% साक्षरतेचे प्रमाण हे परळी, केज, आष्टी व माजलगाव या तालुक्यात आढळून येते तर ७५% पेक्षा साक्षरता ही पाटोदा, गेवराई, धारुर, शिरुर (का) व वडवणी या तालुक्यात आढळून येते.

बीड जिल्ह्यातील साक्षरतेपैकी पुरुष साक्षरतेचा विचार केल्यास असे दिसते की, जिल्ह्यातील पुरुष साक्षरता ही ८५.५५% इतकी आहे. यापैकी ८५% पेक्षा जास्त लोकसंख्या साक्षरता ही अंबाजोगाई, बीड व परळी या तालुक्यात आढळते तर ८३% ते ८५% या दरम्यान साक्षरता ही केज, आष्टी, पाटोदा, माजलगाव, गेवराई व शिरुर (का) या तालुक्यात आढळते. ८३% पेक्षा कमी साक्षरता ही धारुर व वडवणी या तालुक्यात आढळते.

एकुण साक्षरतेपैकी स्त्री साक्षरतेचा विचार केल्यास असे दिसते की, जिल्ह्यात स्त्री साक्षरता ही ६७.८२% इतकी आहे. यामध्ये ७०% पेक्षा जास्त साक्षरता ही अंबाजोगाई, बीड व परळी या तालुक्यात आढळते तर ६३% ते ७०% या दरम्यान साक्षरता ही केज, आष्टी, माजलगाव, गेवराई व धारुर या तालुक्यात आढळते. ६३% पेक्षा कमी साक्षरता ही पाटोदा, शिरुर (का) व वडवणी या तालुक्यात आढळते.

बीड जिल्ह्यातील स्त्री पुरुष साक्षरतेच्या प्रमाणातील फरक लक्षात घेतला तर असे दिसते की, हा फरक जिल्हास्तरावर १७.७३% इतका आहे. स्त्री पुरुष साक्षरतेतील २०% पेक्षा जास्त फरक हा पाटोदा, शिरुर (का) व वडवणी या तालुक्यात आढळतो तर १८% ते २०% स्त्री पुरुष साक्षरतेतील फरक हा गेवराई, धारुर, आष्टी, केज व माजलगाव या तालुक्यात आढळतो. १८% कमी स्त्री पुरुष साक्षरतेतील फरक हा परळी, बीड व अंबाजोगाई या तालुक्यातून दिसून येतो.

**लिंग गुणोत्तरः**

देशातील एकूण लोकसंख्येत स्त्री व पुरुषाचे प्रमाण कसे आहे हे पाहणे म्हणजेच लिंग रचनेचा अभ्यास होय. पुरुष व स्त्री यांचे प्रमाण नेहमी गुणोत्तराच्या स्वरुपात व्यक्त केले जाते. त्यास लिंग-गुणोत्तर असे म्हणतात. तक्ता क्र. २ मध्ये अभ्यासक्षेत्रातील सन २०११ वर्षाच्या तालुकानिहाय लिंगगुणोत्तराचा कल अभ्यासण्यात आला आहे.

तक्ता क्र. २

**बीड जिल्हा : लिंग गुणोत्तर (सन २०११)**

| अ.क्र. | तालुके | लिंग गुणोत्तर (२०११) |
|---|---|---|
| १ | आष्टी | ९२१ |
| २ | पाटोदा | ८९८ |
| ३ | शिरुर (का.) | ९०० |
| ४ | गेवराई | ९१७ |
| ५ | माजलगांव | ९१६ |
| ६ | वडवणी | ९०६ |
| ७ | बीड | ९०७ |
| ८ | केज | ८९८ |
| ९ | धारुर | ९०४ |
| १० | परळी | ९१९ |
| ११ | अंबाजोगाई | ९२७ |
| | एकूण जिल्हा | ९१२ |

स्त्रोत: बीड जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१५

बीड जिल्ह्यामध्ये सन २०११ मध्ये दर हजारी पुरुषाच्या प्रमाणात स्त्रियांची संख्या म्हणजेच लिंग - गुणोत्तर हे ९१२ एवढे नोंदले गेले. ९०० पेक्षा कमी लिंग - गुणोत्तर हे पाटोदा (८९८), शिरुर (९००), केज (८९८) तालुक्यात निर्देशनास आले तर ९०० ते ९१५ च्या दरम्यान लिंग - गुणोत्तर बीड (९०७), वडवणी (९०६), धारुर (९०४) तालुक्यात दिसून येते. ९१५ पेक्षा लिंग - गुणोत्तर हे अंबाजोगाई (९२७), परळी (९१९), माजलगाव (९१९) व गेवराई (९१७) तालुक्यात आढळून येते.

**संदर्भ :**


- कार्लेकर श्रीकांत व मोहन काळे (२०१०): भूगोलशास्त्रातील संशोधन पद्धती, डायमंड प्रकाशन, पुणे.
- नाकतोडे व लांजेवार (२००९): नकाशाशास्त्र व प्रात्यक्षिक भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा बीड, २००१ ते २०१५
- Dubey R. N. and Singh R. L. (1973): Economic and commercial Geography, Kitab Mahal Allahabad.